# पंचायत समिती, वर्धा, जि. वर्धा

जा. क्रं.

दिनांक १५/१२/२०११

## बांधकाम मंजुरी पत्र

कार्यालय ग्रामपंचायत साटोडा त. जि. वर्धा

श्री मंगला मनोहरराव घडे
चंद्रशेखर देविदास सरोदे

विषय :- मंजुर लेआउटवर स्वतःच्या मालकीचे जागेवर बांधकाम करण्यास मंजुरी देणेबाबत.

महोदय,

आपले दिनांक १०/१२/२०११ चे विनंती अर्जानुसार खालील शर्ती व अटीला अधीन राहून बांधकामाची परवानगी प्रदान करण्यांत येत आहे

१) शासनाचे नगर विकास विभागाचे परिपत्रक क्रं. टीपीएस / १२९४ / १३४० / प्र.क्रं. / २३५ / ३४ / नावि - १२ दिनांक १४.१०.१९९४ अन्वये राज्यातील संपूर्ण ग्राम पंचायत क्षेत्राकरिता "ब" व "क" वर्ग नगर परिषद करिता लागू आलेल्या विकास नियत्रण नियमावलीला अधीन राहून बांधकामास मंजुरी देण्यांत येत आहे.

२) महाराष्ट्र ग्राम पंचायत ( गांवठाणाच्या विस्ताराची तत्वे आणि इमारतीचे नियमन ) नियम १९६७ च्या नियम ७ ला अधीन राहून बांधकामास मंजुरी देण्यांत येत आहे.

३). एका भुखंडात एकच इमारत बांधण्यात यावी. उघडे ओटे, आवाराच्या भिंती, स्नानगृहे यासाठी क्षेत्र वगळता इमारत जेवढ्या जागेवर बांधावयाची आहे ती जागा भुखंडाच्या क्षेत्रात ४० टक्क्यापेक्षा जास्त असु नये.

४) खालील प्रमाणे भुखंडाच्या बाजुपासुनची मुख्य इमारतीची पिछेहाटीची रेषा पुढील प्रमाणे असावी.

| भुखंडाचे क्षेत्र | समोरच्या बाजुने पिछेहाट | दोन्ही बाजुकडील खुली जागा | मागली बाजुची खुली जागा |
|---|---|---|---|
| (320+390) चौ.मी.<br>एकूण 710 चौ.मी. | ४.५ चौ.मि. | ३ चौ.मी. | ४.५ चौ.मि |

५) निर्धारित नकाशात नमुद केलेल्या जागेवर बांधकाम करावे.

६) बांधकाम एक वर्षाचे आतच पूर्ण करावे.

७) मंजूर लेआउट असल्यामुळे नियमानुसार नाली, रोड तथा पाणी व्यवस्था स्वतःच करावी लागेल.

८) बांधकाम पूर्ण होताच मुल्यांकनाचा दाखला त्वरीत ग्राम पंचायतला सादर करावा.

९) नियमानुसार मुल्यांकनाचे आधारे आकारण्यांत येणारा कर भरण्यास बांधील राहाल.

१०) सांड पाण्याच्या व्यवस्थेकरिता शोष खड्डा स्वतःच्या भुखंडात स्वतः तयार करावा लागेल.

११) पाच वृक्ष भुखंडात लावून स्वतः जोपासना करावी.

करिता ग्राम पंचायत साटोडाची सभा दिनांक १४/१२/२०११ चे सभेत ठराव क्रमांक ८(२) प्रमाणे सर्व्हे क्रमांक २ अ, २ ब, लेआउट मधी प्लॉट क्रमांक ८, ९ तरील बांधकामास वरील अटीसह मंजुरी देण्यात येत आहे.

[signatures]